ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष १८

## महाराष्ट्र दिन विशेषांक

अंक १





१ मे, १९७२

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल!

# किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप

● पंपाची बांधणी मजबूत असल्याने झीज कमी व त्यामुळे दुरुस्तीचा खर्च कमी होतो.
● विजेच्या खर्चात बचत होते. ● कमी वेळात जास्त पाणी ओढू शकतो. त्यामुळे कामाचा लवकर उरक व मजुरीच्या खर्चात बचत होते.




## खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येत.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यामुळे किर्लोस्कर 'केडी' पं अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.,** उद्योग भवन, टिळक रोड, पुणे २

STUJA 739



☆ अर्थ ☆

महाराष्ट्र दिन विशेषांक

बुधवार, ३ मे, १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## बँकिंगचे धोरण बदलले, पण कारभारात अजून फारसा बदल नाही

इंडियन बँक्स असोसिएशनचे चेअरमन डॉ. बी. एन. आडारकर ह्यांनी असोसिएशनच्या गेल्या वार्षिक सभेत बँकिंगच्या धंद्यापुढील समस्यांचे उत्कृष्ट दिग्दर्शन केले आहे. नव्या धोरणाला अनुसरून झपाट्याने पावले टाकण्यात आली, पण कारभाराच्या दृष्टीने परंपरागत पद्धतीत सुधारणा पुरेशी घडून आलेली नाही, नव्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्टाफची तयारी अद्याप करून घेतली गेलेली नाही, ग्रामीण शाखा उघडल्या पण तेथील बचत बँकांकडे कशी आकृष्ट होईल ह्याचा विचार झालेला नाही, बँकांची जनतेची सेवा पुष्कळच सुधारायला हवी आहे, खर्च मात्र वाढत आहे, इत्यादी गोष्टींचा त्यांनी उल्लेख करून बँकिंग कमिशनच्या शिफारशीकडे बोट दाखविले आहे. त्यांनी मांडलेले मुद्दे थोडक्यात येथे सांगितले आहेत.

बँकिंगच्या धोरणात दूरगामी फरक केले जात आहेत. जेथे जेथे तांत्रिक आणि व्यवस्थापकीय पात्रता आहे, नैतिक आणि आर्थिक शिस्त आहे, संपत्ती आणि रोजगार निर्माण करण्याची संधी आहे, तेथे तेथे तारण, वैयक्तिक जामिनकी, मार्जिन्स, इत्यादी परंपरागत बँकिंगच्या नियमात सैलपणा आणला जात आहे.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर अडीच वर्षांत बँक कचेऱ्यांची संख्या ८,३०० वरून १३,००० वर गेली. आणखी अडीच-तीन वर्षांत ती संख्या १८,००० पर्यंत पोचेल. त्यामुळे ग्रामीण आणि मागास भागातील जनतेची सेवा करता येणे बँकांना शक्य झाले आहे.

लहान व्यापारी, लहान शेतकरी, छोटा कारखानदार निवडून काढून त्याला मदत करणे, हे बँकांचे नवे धोरण आहे. बँकांना आपली दृष्टी नव्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी बदलावी लागली आहे.

आज १३,००० बँक कचेऱ्या आहेत त्या चालविण्यासाठी मॅनेजर आणि स्टाफ मिळविणे, ही बँकांची मोठीच गरज आहे. जरूर त्या पात्रतेचे आणि मनोधारणेचे पुरेसे लोक मिळवून त्यांना शिक्षण देणे, ही फारच मोठी समस्या आहे. त्या संबंधातील कामगिरी थोडी मागे पडली आहे, ती येत्या तीन ते पाच वर्षांत भरून काढता येईल अशी आशा आहे.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर शेड्यूल्ड व्यापारी बँकांकडील ठेवी ४,७०० कोटी रु. वर गेल्या आहेत. तरी सुद्धा ठेवी गोळा करणे हाच अजून बँकिंग धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण बचत बँकांकडे आकर्षण्याच्या प्रश्नाचा खोलवर, सर्वांगीण विचार व्हायला हवा.

नव्या धोरणाप्रमाणे, बँकांच्या मॅनेजरांनीच छोट्या छोट्या लोकांच्या पात्रतेवर आणि सचोटीवर विश्वास ठेवून त्यांना उद्योगास प्रवृत्त करावयाचे आहे; त्यासाठी त्यांना हरएक प्रकारची मदत द्यावयाची आहे.

बँकांच्या सेवेतही पुष्कळ सुधारणा घडवून आणायला हवी. चेक्स, बिल्स, इत्यादींची संख्या वाढत आहे आणि त्याबाबत होणाऱ्या खोळंब्यामुळे बरीच नाराजी निर्माण होत आहे; ह्यात सुधारणा व्हायला हवी.

बँकिंगची झालेली प्रचंड वाढ लक्षात घेता बँकांच्या कार्यपद्धतीचा आमूलाग्र फेरविचार करणे आवश्यक झाले आहे. १५ ते २० हजार शाखांच्या जाळ्याचे काम चांगल्या तऱ्हेने चालायला हवे.

बँकिंग कमिशनने सुचविलेल्या सुधारणा दूरगामी स्वरूपाच्या आहेत. ग्रामीण आणि प्रादेशिक बँकिंग, व्यापारी आणि सहकारी बँकांच्या कामात एकसूत्रीपणा, अंतर्गत नियमन, बँकांचे भांडवल आणि खर्चाचे प्रमाण, ह्या संबंधीच्या कमिशनच्या शिफारशी मूलग्राही महत्त्वाच्या असून त्या अमलात आणल्या म्हणजे बँकिंगच्या धोरणाला नवे वळण लागेल. सध्या तरी जनतेच्या सेवेत सुधारणा न होता बँकिंगच्या धंद्याचा खर्च मात्र सालोसाल वाढत आहे.

---

## रोजगारांचेही रेशनिंग करण्याची सूचना

जयपूर येथे एका प्रसंगी बोलताना भारताचे संरक्षणमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनी नोकऱ्यांचे रेशनिंग करावे अशी सूचना केली आहे. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा की अन्नटंचाई उत्पन्न झाली की रेशनिंगची पद्धत सुरू करण्यात येते. मग नोकऱ्यांची टंचाई असताना हीच पद्धत का अमलात आणू नये? ह्या संबंधी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की योगक्षेम चालविण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला एकापेक्षा अधिक साधने उपलब्ध असू नयेत. समजा एखाद्या नोकरीसाठी सारख्याच दर्जाच्या व लायकीच्या दोन अगर अधिक उमेदवारांचे अर्ज आले; तर मग काय करावे? संरक्षण मंत्र्यांचे म्हणणे असे आहे की, ह्या उमेदवारात ज्या उमेदवाराला नोकरीची सर्वात अधिक गरज असेल त्याची नेमणूक करण्यात यावी. त्यामुळे सामाजिक न्यायही साधला जाईल.

## विवाहाचे वय वाढविण्याचा विचार

भारत सरकार विवाह करण्यास जरूर असणाऱ्या वयात वाढ करण्याचा विचार करीत आहे. सध्या तरुणींना १५ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय कायदेशीर रीत्या लग्न करता येत नाही. ही मर्यादा वाढवून वय १६ करण्याचे घाटत आहे. मुलांच्या बाबतीत विवाह करण्यासाठी लागणाऱ्या किमान वयाचा प्रश्न फारसा वादग्रस्त नव्हता व नाही. सध्या ही वयोमर्यादा १८ आहे. ह्या वयात बदल करावयाचा की नाही ते अद्याप ठरविण्यात आलेले नाही. मुलामुलींच्या लग्नयोग्य वयाबाबत पुन्हा विचार करण्याचे कारण लोकसंख्येच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीशी निगडित आहे. उशिरा विवाहबद्ध झाल्यामुळे जोडप्याच्या प्रसूतिक्षम काळात आपोआपच कपात होते आणि मुलांची संख्या कमी होते. निराळ्या शब्दांत, कुटुंबनियोजनाच्या कामात विवाहाची वयोमर्यादा वाढविण्याने मदत होईल अशी अपेक्षा आहे. औद्योगिक युगात प्रवेश केलेल्या सर्व देशांतील लोकसंख्येच्या वाढीचा वेग मंदावलेला आढळून येतो झाला कारण उशिरा विवाह करण्याची प्रथा त्या देशांतून परिस्थितीच्या रेट्याने रूढ होत जाते. भारतात लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याचे प्रयत्न अनेक दिशांनी होत आहेत. अलीकडेच मंजूर झालेला गर्भपाताचा कायदाही ह्याच प्रयत्नाचा एक भाग आहे. तथापि विवाहाच्या वयाची मर्यादा वाढविल्याने लोकसंख्येच्या वाढीचा वेग फारसा कमी होईल असे मानण्यास जागा नाही. कारण वयोमर्यादा वाढविण्याचा कायदा ग्रामीण भागात कितपत पाळला जाईल ह्यावर बरेच काही अवलंबून आहे. सध्या असलेला विवाहयोग्य वयाचा कायदा ग्रामीण भागात अजूनही कसोशीने पाळला जात नाही. तेव्हा नवा कायदा करूनही ह्या बाबतीत फार प्रगती होणे कठीण वाटते.

---

## खाजगी गुप्त पोलिसांचा दिल्लीत मेळावा ?

आंतरराष्ट्रीय खाजगी गुप्त पोलिसांचा एक मेळावा दिल्ली येथे भरविण्यात येण्याची शक्यता आहे. ह्या गुप्त पोलिसांच्या संघटनेची वार्षिक परिषद दरसाल कोठेतरी होत असते. दिल्ली येथे परिषद भरविण्याची कितपत शक्यता आहे ते अजमावण्यासाठी दोन नामवंत खाजगी अमेरिकन गुप्त पोलिस भारतात आले आहेत. परिषद दिल्लीत भरविण्याचे ठरले तर ३०० ते ४०० परदेशीय गुप्त पोलिस भारतात येतील. सध्या भारतात खाजगी कंपन्यातच सुरक्षिततेसाठी गुप्त पोलिसांची मदत घेण्यात येते. परिषद दिल्लीत भरली तर गुप्त पोलिस वापरीत असलेल्या अनेक साधनांचे एक प्रदर्शनही भरविण्यात येईल. त्यात विजेची उपकरणे, बटनांतील कॅमेरे, खिशात मावणारे टेप रेकॉर्डर्स, इत्यादी आधुनिक साधने असतील.

---


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणे ३०

देखें सकळार्तीचे जियालें। आजि पुण्य यशासि आलें।
हे मनोरथ जहाले। विजयी माझे ॥ (श्री ज्ञानेश्वरी)

**महाराष्ट्र राज्याच्या वर्धापनदिनी जाहीर करण्यास आनंद वाटतो की चालू हंगामात साखरेचे उत्पादन २ लाख पोत्यांच्यावर झाले आहे.**

**स्पिरिट व मद्याचे उत्पादनही व्यवस्थित चालू आहे.**

महाराष्ट्र राज्याच्या वर्धापनदिनानिमित्त आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !

ज. चं. आगाशे,
ज्ञा. चं. आगाशे,
जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

# दि सांगली बँक लिमिटेड,

रजिस्टर्ड ऑफिस,

राजवाडा चौक, सांगली

सांगली बँकेच्या भागीदारांच्या तारीख १४ एप्रिल १९७१ रोजी दुपारी चार वाजता भरलेल्या
५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी झालेले

## चेअरमन, श्री. वा. त्रिं. कोरके यांचे भाषण

सद्‌गृहस्थ व सद्‌भगिनींनो,



बँकेच्या भागीदारांच्या पंचावन्नाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी आपले हार्दिक स्वागत करण्यास मला अत्यानंद होत आहे.

ताळेबंदावरून पाहता या वर्षीही पूर्वीप्रमाणेच संस्थेच्या व्यवहारात स्थिर व समाधानकारक प्रगती झाल्याचे आढळून येते. बँकेचे वसूल झालेले भांडवल रुपये एकोणतीस लाख झाले आहे. बँकेच्या एकूण ठेवी रुपये १८·६८ कोटींच्या वर गेल्या असून अहवालाचे साली ठेवींमध्ये रु. २·४९ कोटींनी वाढ झाली आहे. गेल्या सालच्या एकूण ठेवींच्या १५ टक्के अहवालाच्या साली वाढ झालेली दिसून येईल. सर्व शाखांतून ठेवी संपादन करण्याच्या दृष्टीने बँकेने वेगवेगळ्या योजना आखल्या असून, योग्य मार्गाचा अवलंब करून ठेवींमध्ये भरीव वाढ करण्याच्या दृष्टीने बँकेची शासनयंत्रणा सतत प्रयत्नशील असूनही दुर्दैवाने आमच्या अपेक्षेप्रमाणे ठेवींमध्ये वाढ झालेली नाही. आम्ही वेगवेगळ्या ठेवी–योजना सुरू केल्या असून त्यांची माहिती लोकांना होण्याकरिता आकर्षक जाहिराती देऊन आम्ही विस्तृत स्वरूपात प्रसिद्धी–मोहीमही हातात घतली आहे. या विविध प्रकारच्या प्रसिद्धी–योजना आम्ही अंगीकारल्यामुळे व गिऱ्हाइकांना आमच्याकडून मिळणाऱ्या उत्कृष्ट व सत्वर सेवेमुळे आम्हाला अशी खात्री आहे की, थोड्याच कालावधीत आमच्या ठेवींमध्ये शीघ्र गतीने भरीव वाढ होऊन पंचवीस कोटींपर्यंत आम्ही पोहोचू व अ वर्गाच्या बँकांचा दर्जा मिळविण्याच्या दृष्टीने गुणवत्ता संपादन करू.

या बाबतीत हे नमूद करणे आवश्यक आहे की, बहुअंशी आपल्या शाखा ग्रामीण भागात असून ठेवी संपादन करण्याच्या बाबतीत त्यांना सहकारी बँकांशी तीव्र स्पर्धेस तोंड द्यावे लागते. ह्या बँकांवर त्यांनी स्वीकारलेल्या ठेवींवरील व्याजाच्या दराबाबत कोणत्याही प्रकारचे निर्बंध लादले गेलेले नाहीत. व्यापारी बँकांना मात्र याबाबतीत रिझर्व्ह बँकेचा आदेश पाळावा लागतो. ही बाब योग्य त्या अधिकारी वर्गाच्या निदर्शनास आणली गेली आहे.

ठेवींबरोबर कर्ज देण्याच्या आकड्यातही त्या प्रमाणात वाढ झालेली असून अहवालाच्या साली एकूण कर्जे रु. ११·०२ कोटींची दिली आहेत. गेल्या साली एकूण कर्जाचा आकडा रु. ९·९९ कोटी होता. कर्ज देण्याच्या प्रकारातही सुधारणा झाली असून तारीख ३१-१२-१९७१ रोजी प्रायारिटी सेक्टर्सकरिता एकूण २०७५ खातेदारांना रुपये २·३५ कोटींचे कर्जवाटप करण्यात आले आहे. गेल्या वर्षापेक्षा या साली प्रायॉरिटी सेक्टर्सना दिलेल्या एकूण कर्जवाटपामध्ये शेकडा २·०५ टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येते.

गेल्या वर्षी मी माझ्या भाषणामध्ये सांगितल्याप्रमाणे शेतकी-कर्जाचा विषय हा अत्यंत बिकट होऊन बसला आहे. कारण येत्या ३।४ वर्षांत शेतकऱ्यांच्या गरजा फार मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाचा विनियोग योग्य प्रकारे होतो किंवा नाही याबद्दल बँक सावधगिरी बाळगते. आपण दिलेल्या कर्जाची परतफेड व्हावी या दृष्टीने, त्या त्या हंगामातील पिकांची वाढ योग्य प्रकारे होते किंवा नाही याबद्दलही वारंवार पाहणी करून लक्ष पुरविले जाते. शेतकी-कर्जाच्या बाबतीत जमिनीच्या तारण–गहाणाच्या दस्तास स्टॅम्प ड्युटी माफ असावी व इक्विटेबल मॉर्टगेजची सोय नुसत्या मुंबईऐवजी महाराष्ट्र राज्याच्या जिल्ह्यांच्या ठिकाणी व्हावी याबद्दल आपल्या बँकेने सरकारला मागणी केली आहे. सहकारी बँकांना त्यांची शेतकी-कर्जे वसूल करण्याकरिता जशा सरकारी थकबाकी वसूल करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सवलती दिल्या जातात तसल्याच सवलती व अग्रहक्क व्यापारी बँकांनाही मिळावेत अशीही सूचना आम्ही महाराष्ट्र सरकारपुढे मांडली आहे. इंडियन बँक्स असोसिएशन व ॲग्रीकल्चरल फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडनेही याबाबत राज्य सरकारकडे व रिझर्व्ह बँककडे विधायक सूचना केल्या आहेत. परंतु त्यासंबंधी अद्यापि निर्णय समजलेला नाही. मध्यंतरी दुष्काळपीडित भागामध्ये शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जांवर तारण-गहाण दस्तास स्टॅम्प ड्यूटी माफ करण्यात आल्याबद्दलची जाहीर घोषणा राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या बाबतीत देण्यात आली होती. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेशी आमच्यासारख्या राष्ट्रीयीकरण न झालेल्या इतर

बँकांचा जास्त घनिष्ट संबंध येत असतानाही राष्ट्रीयीकृत बँका व इतर बँका असा अन्याय्य व पक्षपाती फरक का करण्यात यावा हे समजत नाही.

अहवालाच्या साली बँकेस निव्वळ नफा रु. ३·५८ लाख इतका झाला. गेल्या वर्षी निव्वळ नफा रु. ५·५४ लाख झाला होता. ता. ३१-१२-१९७१ अखेरच्या वर्षाकरिता वसूल झालेल्या भाग-भांडवलावर १५ टक्क्यांऐवजी दर शेकडा १३ टक्के डिव्हिडंड भागीदारांना वाटावे अशी संचालकमंडळाने शिफारस केली. चालू वर्षी बँकेच्या नोकरवर्गाच्या शिल्लकी देण्यांची पूर्तता करण्यात आल्यामुळे बँकेच्या नफ्यात घट झाली. तथापि बँकेच्या स्थितीत आता बरीच सुधारणा झाली आहे.

१९७२ सालापासून गेल्या ३।४ महिन्यांत कर्ज देण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून सर्व उपलब्ध भांडवल पूर्णत: किफायतशीरपणे गुंतवले गेले असून कर्जाप्रमाणे ठेवींमध्येही त्या प्रमाणात वाढ होत असल्याने चालू साली नफ्याचे प्रमाण बऱ्याच अंशी वाढून येईल अशी आम्हास खात्री आहे. या वर्षी भागीदारांना १५ टक्के करपात्र डिव्हिडंड देवून त्याचप्रमाणे रिझर्व फंडामध्ये योग्य प्रमाणात वाढ होईल अशी आम्हांस पूर्ण खात्री आहे.

येथे मला नमूद करण्यास आनंद वाटतो की, बँकेच्या व्यवस्थापकांचा कर्मचाऱ्यांच्या युनियनशी बरीच वर्षे चिघळत असलेला तंटा या वर्षी एकमेकांमधील उपयुक्त चर्चेनंतर मिटविण्यात आला आहे. या सर्वांचा परिणाम सर्व श्रेणीतील कर्मचारी व व्यवस्थापकवर्ग यांच्यातील परस्परसंबंध निगडित होऊन बँकेचा व्यवहार व तिच्या ग्राहकांना मिळणारी सेवा यात सर्वकष सुधारणा होण्यात दिसून येईल अशी आम्हास खात्री वाटते.

व्यापारी बँका, सहकारी बँका व आर्थिक व्यवहार करणाऱ्या इतर संस्था यांची रचना व त्यांचे व्यवहारातील परस्परसंबंध यांचा अभ्यास करण्याकरिता भारत सरकारने नेमलेल्या बँकिंग कमिशनने सरकारकडे आपला रिपोर्ट सादर केला आहे आणि त्या रिपोर्टातील उपलब्ध माहितीवरून भारतातील बँकांसंबंधी काही चित्तवेधक स्वरूपाच्या बाबी प्रकाशित झाल्या आहेत. भारतातील बँकांची पुनर्रचना करून अखिल भारतीय स्वरूपाच्या अशा दोन अगर तीन बँका ठेवाव्यात व कालीशा बहुसंख्य बँकांची प्रादेशिक पातळीवर पुनर्रचना करून या बँकांनी त्या त्या भागातील लोकांच्या आर्थिक गरजा भागवाव्यात अशी शिफारस या कमिशनने केल्याचे समजते. या प्रादेशिक बँकांना सहाय्य अगर अंगभूत अशा कर्ज देणाऱ्या आर्थिक संस्था ग्रामीण भागात स्थापन करून त्या त्या भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा अशा संस्थांतर्फे भागविल्या जाव्यात अशीही त्यांची शिफारस आहे.

जरी या घटनांचे स्वरूप स्पष्ट होण्यास काही कालावधी लागला तरी या नवीन घडून येणाऱ्या बँकांच्या पुनर्रचनेमध्ये आमच्या संस्थेचे कोणते स्थान राहील याबद्दल आपण जागरूक राहणे इष्ट आहे. तथापि देशाचे आर्थिक धोरण व भविष्यातील पंचवार्षिक योजना घडविण्याबाबत सध्या जे बदलाचे वारे वहात असल्याचे दिसून येते त्यांची परिणती देशाला सध्याचा आर्थिक ताण सहन करण्यास व सांप्रतच्या बिकट समस्येतून निश्चितपणे बाहेर पडण्याकरिता मदत होण्यात झाली तर देशात आर्थिक स्थैर्य निर्माण होऊन तो उन्नतिप्रत पोहोचू शकेल अशी आम्हांस आशा वाटते.

अहवाल-साली आम्ही कुरुंदवाड, कुपवाड, कुडित्रे, रामानंद-नगर व बुधगाव या पाच ठिकाणी बँकेच्या नवीन शाखा उघडल्या असून एकूण शाखांची संख्या ६५ झाली आहे. माझ्या सहकारी संचालकांनी गेल्या वर्षात मला बँकेच्या कामकाजात जे बहुमोल सहाय्य व सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. दोन डायरेक्टरांची निवृत्ती व दोन डायरेक्टरांचे राजीनामे यामुळे रिकाम्या झालेल्या चार जागांकरिता संचालकांची निवड करावी अशी मी विनंती करतो.

महाराष्ट्र व म्हैसूर राज्यात ठिकठिकाणी पसरलेले व्यापारी-वर्गातील आमचे आश्रयदाते, इतर ठेवीदार व कर्जदार यांना बँकेतर्फे असे आश्वासन देतो की, सांगली बँक पूर्वीप्रमाणेच त्यांच्या सेवेला तत्पर राहील एवढेच नव्हे तर आमची कार्यक्षमता वाढवून सर्वांच्याकडून मोठ्या प्रमाणात आश्रय व सदिच्छा संपादन करण्याचा आटोकाट प्रयत्न करील.

( वि. सू. :—हे भाषण म्हणजे वार्षिक साधारण सभेच्या वृत्तांताची नोंद, असे समजावयाचे नाही. )

---

## डॉ. गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालय २८ मे रोजी यशवंतरावांचे हस्ते उद्‌घाटन

नागपूर येथील डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालयाचे उद्‌घाटन २८ मे, १९७२ रोजी भारताचे अर्थमंत्री ना. यशवंतराव चव्हाण ह्यांचे हस्ते होणार असून समारंभाचे अध्यक्षस्थान राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्ष श्री. उदयभानसिंह हे स्वीकारणार आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

ह्या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे, गेली कित्येक वर्षे शिक्षणखात्याचे प्रमुख असलेले आणि अगदी अलीकडेपर्यंत हंगामी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करीत असलेले श्री. य. द. देशपांडे यांची नेमणूक झाली आहे.

---

**तुटीची अर्थ व्यवस्था : तिचा उपयोग, पद्धती आणि मर्यादा** वरील विषयावर गुरुवार, दि. २५ मे रोजी पुणे आकाशवाणी-वर रात्री ९-१५ वाजता श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ' ह्यांचे इंग्रजीमधून भाषण होणार आहे.

## हिंदी एंजिनिअर्स भारतात परत येण्यास उत्सुक

गुजरात राज्यात खनिज तेल आणि रासायनिक कारखान्यांचे फार मोठे जाळेच उभारण्यात येणार आहे. ह्या कारखान्यांच्या समुहासाठी ३०० कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय आसाम आणि बरौनी ह्या ठिकाणीही अशीच औद्योगिक केंद्रे स्थापन करण्यात यावयाची आहेत. सध्या त्यांच्या योजनांची आखणी करण्यात येत आहे. ह्या मोठ्या औद्योगिक संघटना अनेक एंजिनिअर्सना व तंत्रज्ञांना काम देऊ शकतील. सुदैवाने भारताला त्यांचा तुटवडा पडणार नाही. इंडिअन पेट्रो-केमिकल कार्पोरेशनचे एक मंडळ अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले आहे. खनिज तेल आणि रासायनिक कारखान्यांसाठी जरूर असणाऱ्या एंजिनिअर्सची भरती करणे हा ह्या मंडळाचा हेतू आहे. सध्या अमेरिकेत काम करणारे अनेक लायक केमिकल एंजिनिअर्स भारतात काम करण्यास तयार आहेत असे मंडळाला आपल्या दौऱ्यात आढळून आले. ह्यापैकी अनेक एंजिनिअर्स अमेरिकेतील खाजगी कंपन्यात नोकऱ्या करीत असून त्यांना १ हजार डॉलर्स पासून २,५०० डॉलर्सपर्यंत दरमहा पगार मिळतो. रुपयाच्या चलनात हे आकडे ७,३६० ते १८,२०० रु. इतके होतात आणि तरीही इतक्या मोठ्या पगाराच्या नोकऱ्या सोडून भारतात दरमहा ९०० ते २,५०० रुपयापर्यंतच्या पगाराच्या नोकऱ्या स्वीकारण्याची त्यांची तयारी दिसून आली. ह्याचा अर्थ असा लावण्यात येत आहे की भारतामधून परदेशात होणारी बुद्धिमंतांची निर्यात उलट दिशेने फिरविण्याची शक्यता आहे. इतर उद्योगधंद्यांनाही तज्ज्ञ हिंदी एंजिनिअर्स अमेरिकेतून मिळू शकतील.

युरोपमधील अनेक मोठ्या शहरातूनही तज्ज्ञ केमिकल एंजिनिअर्स मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. बॉन, पॅरीस, लंडन यांसारख्या शहरांतील वृत्तपत्रांतून नोकऱ्यांच्या जाहिराती देण्यात आल्या. त्यांना चांगला प्रतिसाद मिळून १,१०० अर्ज मंडळाकडे आले. त्यांची छाननी करून ४०० उमेदवारांच्या मुलाखतीही घेण्यात आल्या. खुद्द कॉर्पोरेशनला ७० ते ८० केमिकल एंजिनिअर्स, मेकॅनिकल एंजिनिअर्स कारभारविषयक तज्ज्ञ इत्यादींची गरज आहे. तथापि आलेल्या अर्जांतून कित्येक तज्ज्ञ, एंजिनिअर्सची नावे भारतामधील सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंद्याकडे पाठविण्यात येणार आहेत. हिंदुस्थान मशीन टूल्स आणि हिंदुस्थान कॉपर ह्या कारखान्यानीही तज्ज्ञ एंजिनिअर्स मिळविण्याविषयी आस्था दाखविली आहे. नोकरीसाठी अर्ज केलेल्या एंजिनिअरांची वये २३ ते २४ च्या दरम्यानची आहेत. भारतात त्यांच्या दर्जाच्या तज्ज्ञांना जो पगार मिळतो त्यापेक्षा अधिक पगाराची मागणी त्यांच्यापैकी कोणीही केली नाही. ह्या परिस्थितीला अनेक कारणे आहेत. काही जण सध्याच्या नोकरीत शक्य त्या वरिष्ठ जागापर्यंत पोचले आहेत. परदेशांत हिंदी तंत्रज्ञांना काही मर्यादेपर्यंतच वरच्या जागा मिळू शकतात. शिवाय अनेक देशांतून मंदीची लाट आलेली आहे. त्यामुळे तज्ज्ञ तंत्रज्ञांना सुद्धा नोकरीची शाश्वति वाटेनाशी झाली आहे. काही जणांची कुटुंबे व मुले परदेशाच्या वातावरणात भारतीय जीवनाला पारखी होत आहे. अशा लोकांना शक्य तितक्या लवकर भारतात यावेसे वाटत आहेत. काही जणांना भारतात काम करण्याचे आव्हान पटले आहे. कारण त्यासाठी जरूर असणारी साधने व संधी आता भारतात उपलब्ध आहेत हे त्यांना कळून चुकले आहे.

---

### साखरेच्या धंद्याचा किफायतशीरपणा

| | वर्ष | ठोक नफा विक्रीच्या % | ठोक नफा एकूण भांडवलाच्या % | करानंतर नफा नेट वर्थच्या % |
|---|---|---|---|---|
| उत्तर प्रदेश | १९६९–७० | ८·३ | ७·० | ९·४ |
| | १९७०–७१ | ९·४ | ९·७ | ८·३ |
| महाराष्ट्र | १९६९–७० | ९·१ | ८·२ | ७·२ |
| | १९७०–७१ | ९·४ | ९·७ | ८·३ |
| बिहार | १९६९–७० | ३·० | १·६ | –१२·० |
| | १९७०–७१ | १·७ | १·७ | –२५·४ |
| तामिळनाडू | १९६९–७० | ५·१ | ३·८ | १·६ |
| | १९७०–७१ | ६·९ | ६·५ | १४·४ |
| इतर | १९६९–७० | ५·१ | ३·३ | –२·८ |
| | १९७०–७१ | ७·३ | ७·८ | ५·८ |
| सर्व कंपन्या | १९६९–७० | ८·४ | ८·८ | ८·५ |
| | १९७०–७१ | ९·२ | ८·५ | ९·५ |
| ( अंदाज ) | १९७१–७२ | १०·१ | ९·४ | १०·५ |

---

### साखरेचा उतारा

| | १९६९–७० | १९७०–७१ ( अंदाज ) |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | ९·० | ९·० |
| महाराष्ट्र | १०·७ | ११·० |
| बिहार | ९·१ | ८·६ |
| आंध्र प्रदेश | ९·१ | ९·७ |
| तामिळनाडू | ७·९ | ९·२ |
| इतर | ९·२ | १०·० |
| संबंध भारत | ९·३ | ९·६ |

### हृदयविकाराचा आनुवंशिकतेशी संबंध आहे

दिल्ली येथील विलिंग्डन इस्पितळात उपचार होत असलेल्या दोन हजार हृदयविकाराच्या रोग्यांची पाहणी करण्यात आली असता असे आढळून आले की ह्या रोगाचा आनुवंशिकतेशी महत्त्वाचा संबंध आहे. रोगावर उपचार करणारे तज्ज्ञ डॉक्टर ह्या विषयासंबंधी बोलताना म्हणाले की रोग्यांच्या पार्श्वभूमीची माहिती करून घेत असता असे दिसून आले की त्यांच्या जवळच्या नातलगांपैकी कोणाला तरी पूर्वी हृदय विकाराचा झटका आलेला होता. तरुण रोग्यांच्या बाबतीत ही गोष्ट अधिकच खरी आहे. सध्या इस्पितळात १५ वर्षाच्या एका रोग्यावर उपचार चालू आहेत. हृदयविकाराने आजारी असणाऱ्या रोग्यात हा बहुधा सर्वांत तरुण असावा. त्याच्या कुटुंबातील जवळच्या ४ नातलगांना हृदयविकाराचे झटके येऊन गेलेले होते. २५ ते ३५ वर्षे वयाच्या रोग्यांपैकी बऱ्याच रोग्यांच्या कुटुंबात हाच इतिहास आढळून आला. तेव्हा हृदयविकाराची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबांतील रोग्याने अधिक दक्षता घेण अगत्याचे आहे. सुशिक्षितांच्या बाबतीत एक गोष्ट विशेष लक्षात येते. अशा लोकांपैकी कित्येकावर बरीच वर्षे फार मोठा मानसिक ताण पडलेला दिसतो. काही जणांच्या मनात कसला तरी संघर्ष चालू असतो तर इतरांची दीर्घकाल कुचंबणा झालेली दिसते. वरिष्ठ प्रतीच्या नोकरांच्या बाबतीत ह्या रोगाची झडप पडण्याची वेळ मोठी अर्थपूर्ण म्हणावी लागेल. अशा नौकरांपैकी बऱ्याच जणांवर सवानिवृत्तीनंतरच्या पहिल्या सहा महिन्यांत हृदयविकाराची आपत्ती ओढवलेली दिसते. त्याशिवाय मधुमेह आणि जादा रक्तदाब ह्यापासून त्रास होणाऱ्या लोकांतही हृदयविकार उद्भवण्याची शक्यता असते.

---

### कॉफी आरोग्याला अधिक घातक !

जयपूर येथील एका वैद्यकीय कॉलेजमधील डॉक्टर शर्मा ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की चहापेक्षा कॉफी हे पेय आरोग्यावर आधिक वाईट परिणाम करणारे आहे. ह्या बाबतीत पत्रप्रतिनिधींशी बोलताना ते म्हणाले की "अलीकडे ह्या संबंधी नवीन संशोधन करण्यात आले आहे. त्यावरून असे दिसून आले आहे की चहात फ्लुराइड नावाचे एक द्रव्य असते. ते कॉफीमध्ये नसते ह्या द्रव्यामुळे हृदयाच्या आरोग्याला मदत होते असे आढळून आले आहे."

---

**लिपस्टिकची नवी बाजारपेठ** — पंजाबामधील खेडेगावात लिपस्टिकचा खप इतर ठिकाणापेक्षा जास्त आहे. शेतीच्या उत्पादनातील वाढीमुळे ग्रामीण जनतेची क्रयशक्ती वाढली आहे आणि चैनीच्या वस्तू तेथे अधिक खपू लागल्या आहेत.

**व्हिएटनाम युद्धाचा ब्रिटिश फर्म्सना फायदा** — सुमारे आठ ब्रिटिश कंपन्या व्हिएटनाममधील अमेरिकन सैन्यासाठी युद्धसाहित्याचे उत्पादन करीत आहेत. त्यात हेलिकॉप्टर्स, हॉवरक्राफ्ट, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ह्यांचा समावेश आहे.

**पंचतंत्राची जर्मन आवृत्ती** — पंचतंत्राची नवी जर्मन आवृत्ती जर्मनीमध्ये नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली. श्री. गोविंद चंडिरामाणी आणि प्रो. स. बा. हुदलीकर ह्यांनी सात वर्षे परिश्रम करून ती तयार केलेली आहे.

**गुजरात-राजस्तानात १९ लक्ष मोर** — झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या पाहणीप्रमाणे, गुजरात आणि राजस्तान ह्यांत मिळून १८·८ लक्ष मोर आहेत. त्यांपैकी एकट्या राजस्तानात १२·५ लक्ष मोर आहेत. मोरपिसांच्या व्यापाराला, निर्गतीलाही, बराच वाव आहे.

**लहानांची बिले लवकर भागवा** — मध्यम आणि मोठे कारखाने, त्याचप्रमाणे सरकारची खाती ह्यांनी लघु उद्योगांनी पुरविलेल्या मालाची बिले ४५ दिवसांत भागविली पाहिजेत, अशी रिझर्व्ह बँकेच्या कमिटीची सूचना आहे. ह्यापेक्षा उशीर झाल्यास किमतीवर दंडादाखल व्याज द्यावे लागेल.

**ओरिसामधील आदिवासी मुलींची राज्याबाहेर विक्री** — ओरिसामधील आदिवासी मुलींना उद्योगधंद्यांच्या ठिकाणी नोकरी देण्याचे आमिष दाखवून त्यांची इतर राज्यांत विक्री केली जाण्याची किंवा त्यांना कुंटणखान्यात घातल्याची उदाहरणे वाढत आहेत. ओरिसाच्या पोलिसांनी जाहीर सूचना देऊन मजूर-कंत्राटदारांबरोबर आपल्या तरुणींना न पाठविण्याचा आदिवासींना सल्ला दिला आहे. मुख्यत: पंजाब आणि उत्तर प्रदेश ह्या देशांकडे ह्या तरुणींना नेण्यात येते.

**हिंदी टेलिप्रिंटर्सची निर्गत** — हिंदी टेलिप्रिंटर्सना कुवेत, द. येमेन, सिलोन, नेपाळ, थायलंड, प. जर्मनी, इराण आणि सिंगापूर येथून मागण्या आल्या आहेत. हिंदुस्तान टेलिप्रिंटर्स ह्या सरकारी कंपनीने गेल्या वर्षी २७·७४ लक्ष रु. च्या टेलिप्रिंटर्सची निर्गत केली. कंपनी २१ प्रकारचे टेलिप्रिंटर बनविते.

**जमिनीच्या किमतीचा उच्चांक** — मुंबईच्या रिक्लमेशन विभागातील काही जमिनींचा लिलाव १७ एप्रिल रोजी झाला, तेव्हा एका प्लॉटला दर चौरस वारास १२,८२९ रु. एवढी किंमत आली. म्हणजे, चौरस फुटाला १,४२५ रु. पडले. एका सिनेमा-गृहासाठी घेण्यात आलेल्या ३,३०० चौरस वार प्लॉटचे भुइभाडे दरसाल ३० लक्ष रु. होईल. प्लॉट घेणाराला एका वर्षाचे भाडे म्हणजे ३० लक्ष रु. रोख द्यावे लागतील किंवा बँक गॅरंटी द्यावी लागेल. बँक गॅरंटीसाठीच १% ने दरसाल ३०,००० रु. पडतील. इमारतीवर किमान ५ कोटी रु. खर्च करावा लागेल.

## दाढी कशी करावी ?

दिसायला सामान्य परंतु असायला अत्यंत उपयुक्त अशा विषयांवर छोट्याछोट्या पुस्तिका पाश्चात्य देशांत प्रसिद्ध होत असतात. त्यामुळे, आपल्या लहानसहान चुका सुधारून आपली वेगवेगळी कामे अधिक चांगल्या प्रकारे पार पाडता येतात, कार्यक्षमता वाढते, जीवनातील आनंद वाढतो.

ह्यापासून स्फूर्ती घेऊन श्री. अमलकांत ह्यांनी ' दाढी कशी करावी ? ' ही पुस्तिका लिहिली आहे. तिच्यामधील सूचना दाढी करणाऱ्या प्रत्येकाला उपयुक्त वाटतील. कित्येक कंपन्यांच्या ब्लेडच्या कडांना १, २, ३, ४ असे नंबर दिलेले असतात. त्यांचे रहस्य आणि उपयुक्तता किती जणांना माहीत आहे ?

लेखकाने आपल्या मनोगतात म्हटले आहे —

" तसे पाहिले तर दाढी करणे मोठ्या शहरातील लोकांना काही विशेष नाही, परंतु चांगल्या शिकलेल्या माणसांनासुद्धा घरी स्वतःच्या हाताने नीटपणे दाढी करता येत नाही. घरी स्वतःच्या हाताने सफाईदार व उत्तम दाढी करणे ही एक कला आहे. आपल्या दैनंदिन जीवनात दाढीला आगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. आपले व्यक्तिमत्त्व रुबाबदार दिसून दुसऱ्यांवर छाप पडण्यासाठी दाढी करणे अत्यंत आवश्यक आहे. नोकरी मिळवण्यासाठी, आपल्या मालाची विक्री करण्यासाठी, इतरांच्या मनात आपल्याविषयी आदर व आपुलकी निर्माण करण्यासाठी तुकतुकीत दाढी करणे ही नित्याची गरज होऊन बसली आहे. म्हणून अशा महत्त्वाच्या गोष्टींची यथायोग्य माहिती करून घेणे अगत्याचे बनले आहे.

" चांगल्या शहरात राहणाऱ्या लोकांना नीट दाढी जमत नाही, तर मग ग्रामीण भागातील शेतकरी व मजूरवर्गातील लोकांना दाढी करता येत नसल्यास नवल काय ? या लोकांच्यामुळेच मला हे पुस्तक लिहिण्यास स्फुरण आले. आजकाल ग्रामीण भागातही सुशिक्षित वर्ग वाढू लागला आहे. अगदी लहान खेड्यातसुद्धा सरकारी कोर्ट-कचेऱ्या, शाळा-कॉलेजे, बँका व निरनिराळ्या कंपन्या, संस्था, निघू लागल्या आहेत. त्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दाढी करणे ही नित्याची व आवश्यक बाब होऊन बसली आहे. परंतु ग्रामीण भागातील शेकडा ९० टक्के लोक घरी दाढी न करता बाहेर दाढी करतात. त्यात अनेक तोटे असतात. शिवाय ते आर्थिक दृष्ट्याही परवडणारे नाही.

" ह्या पुस्तकात घरी दाढी कशी करावी, बाहेर दाढी केल्याने काय होण्याची शक्यता असते व दाढी करण्यास लागणाऱ्या सर्व साधनांची माहिती समजावून सांगितली आहे. तसेच दाढीसंबंधी कोणती व कशी काळजी घ्यावी हे सुमारे वीस-बावीस मुद्द्यांत समजावून सांगितले आहे.

" आणि विशेष म्हणजे दाढी करण्याची एक नवीन पद्धत सांगितली आहे. दाढी करताना त्रास होणाऱ्यांना, उलटी दाढी करावी लागणाऱ्यांना, ती फार उपयोगी आहे. आपणाला ही पद्धत आवडेल अशी आशा वाटते, आणि म्हणून हे पुस्तक ग्रामीण भागात व शहरात राहणाऱ्या, दोघांनाही उपयुक्त आहे. थोडक्यात म्हणजे दाढी करणाऱ्या प्रत्येकाने हे पुस्तक एकदा तरी वाचावेच असे आहे. "

लेखक : अमलकांत, रेणुकाप्रसाद, २० इंदिरानगर हौ. सोसायटी एरंडवणे, पुणे ४. पृ. संख्या २३. किं. रु. १ = २५

---

सीलोनच्या लष्करासाठी हिंदी जीपगाड्या — सीलोनच्या सरकारने लष्करासाठी लागणाऱ्या जीपगाड्यांची मागणी मुंबईच्या एका कंपनीकडे नोंदविली होती. मागणीपैकी ४१ गाड्यांचा पहिला हप्ता नुकताच रवाना करण्यात आला. गेल्या ऑक्टोबरमध्ये सीलोनच्या सरकारला भारताने कर्ज दिलेले होते. जीपगाड्यांची किंमत कर्जाऊ दिलेल्या रकमेतून घेण्यात येणार आहे. आणखी गाड्या लवकर पाठविण्यात येतील.




हे व्यर्थ न हो बलिदान !

डिसेंबर-१९७१ मध्ये झालेल्या,
भारत-पाक युद्धात ज्या जवानांनी वीरमरण
पत्करले अगर जे जवान अपंग झाले
अशांच्या कुटुंबियांना चरितार्थ चालविण्यासाठी,
लघुउद्योग, कुटीरोद्योग अगर एखादा
छोटासा व्यापार सुरू करण्यासाठी बँक कर्ज देईल.
अधिक तपशीलासाठी संपर्क साधा.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

### मध्यप्रदेश-महाराष्ट्राला जोडणारा नवा रस्ता

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सरकारांनी उभयता राज्यांना जोडणाऱ्या एका नव्या रस्त्याची बांधणी करण्याचे ठरविले आहे. हा रस्ता २०० मैल लांबीचा असून मध्य प्रदेशातील बस्तर ह्या आदिवासींच्या वस्तीच्या भागापासून नाशिकपर्यंत तो काढण्यात येईल. रस्ता आंध्र प्रदेशातील एका रेल्वे स्टेशनशी जोडण्यात येईल. रस्ता झाल्यावर बस्तर भागातील आदिवासी आणि महाराष्ट्रातील चांदा जिल्ह्यातील आदिवासी ह्यांना अधिक कामधंदा मिळणे शक्य होईल. रस्त्यावर दोन पूलही बांधावे लागतील. त्यातील एक चांदा जिल्ह्यात असेल. त्यासाठी १·२५ कोटी रुपये खर्च येईल. रस्ता झाल्यावर बस्तर जिल्ह्यातील जंगलाचा व्यापार ३५ लाखांनी वाढेल.

### माजी दरोडेखोरांचे सहकाऱ्यांना आकाशवाणीवरून आवाहन

मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ह्यांच्या सीमाप्रदेशात गेली कित्येक वर्षे दरोडेखोरांनी धुमाकूळ घातलेला आहे. श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनी दरोडेखोरांनी आपण होऊन शरणागती स्वीकारावी म्हणून प्रयत्न चालविले होते. त्या प्रयत्नांना बरेच यश येऊन सुमारे शे-दीडशे दरोडेखोर ग्वाल्हेर नजीकच्या एका गावात सरकारच्या स्वाधीन झाले. त्यानंतर त्यांना ग्वाल्हेर येथील तुरुंगात ठेवण्यात आले. तेथे त्यांच्या पुढाऱ्यांनी आपल्या सहकाऱ्यांनी शरणागती स्वीकारावी अशी आवाहने केली. ती ध्वनिमुद्रित करण्यात येऊन मध्य प्रदेशातील अखिल भारतीय रेडिओच्या प्रक्षेपण केंद्रावरून प्रसृत करण्यात आली. तुरुंगात चांगली वागणूक मिळत असून आवाहने स्वखुशीने करीत असल्याचे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

### फिल्म स्टार दोषमुक्त

इन्कमटॅक्स अधिकाऱ्याला खोटी माहिती दिल्याबद्दल पूर्वीची हवाई सुंदरी, आता चित्रपटतारका फरियाल हिचेवर मुंबईमधील प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात खटला भरण्यात आला होता. "मला बँकेतील खाते लपविण्याचे काहीच कारण नव्हते. इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने पुढे केलेल्या कागदावर मी तो न वाचता सही केली" हा आरोपीचा बचाव मॅजिस्ट्रेटने मान्य करून तिला दोषमुक्त ठरविले.

### बिगर-बँकिंग कंपन्यांकडे ठेवींसाठी पळवाट

रिझर्व्ह बँकेने बिगर-बँकिंग कंपन्यांकडील पब्लिकच्या ठेवींवर जी बंधने घातली आहेत, त्यातून सुटण्याकरिता बिगर-बँकिंग कंपन्यांचे काही डायरेक्टर पब्लिककडून स्वतः ठेवी स्वीकारतात आणि त्या संबंधित कंपनीला 'डायरेक्टरांकडून कर्ज' म्हणून देतात. अशा कर्जांना ठेवींबाबत नियंत्रणे लागू पडत नाहीत असा रिझर्व्ह बँकेने खुलासा केला आहे.


## सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :- ३८३३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## ओगले
## प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओबड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी (जि. सातारा)

### बड्या करबुडव्याविरुद्ध कारवाई का नाही !

भारतात एकूण २७ इकन्मटॅक्स कमिशनर्स आहेत, त्यांपैकी निम्म्यापेक्षा जास्त कमिशनरांनी करबुडव्या लोकांपैकी एकाही-जणाविरुद्ध खटला भरण्याची सूचना १९७०-७१ मध्ये केली नाही. एकूण ४२ जणांविरुद्ध खटला भरण्याची सूचना करण्यात आली, ते सर्वजण लहान असामी होते. १९७१-७२ मध्ये २४ कमिशनरांनी ५७ केसेस खटल्यासाठी पाठविल्या, त्याही सर्व लहान असामी विरुद्ध होत्या.

काही कमिशनरांना कायदेशीर कारवाई करण्याजोगे एकही प्रकरण आढळत नाही, हे आश्चर्यच होय. मुंबई शहर हे करबुडव्यांचे केंद्र आहे. तेथे ५ कमिशनर आहेत, पण तेथे १९७०–७१ मध्ये फक्त एका विरुद्धच कारवाई करण्याची सूचना करण्यात आली. १९७१-७२ मध्ये तीन कमिशनरांनी मिळून नऊ प्रकरणे पाठविली पण त्यांपैकी एकाही प्रकरणात कारवाई करण्यास सरकारने मंजुरी दिली नाही. इकन्मटॅक्स कमिशनरांच्या दिल्ली येथील परिषदेत अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी करवसुलीच्या बाबतीत बडे करचुकवे निसटतात, ह्याबद्दल इन्कमटॅक्स कमिशनरांच्या कार्याबद्दल नापसंती व्यक्त केली. श्रीमंत सिनेमा नट–नटींविरुद्ध कडक योजना करण्याचा त्यांनी सल्ला दिला.

---

### ६० लक्ष रुपयांच्या फसवणुकीत बँकेचा सुपरिंटेंडेट ऑफ ब्रँचेस सामील !

लघु उद्योगांना आणि लहान धंदेवाल्यांना राष्ट्रीयीकृत बँका सढळपणे कर्जपुरवठा करतात. त्याचा फायदा उठवण्यासाठी बदमाशांच्या एका टोळीने कलकत्त्याच्या युनायटेड बँक ऑफ इंडियाच्या काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून अस्तित्वात नसलेल्या कित्येक फर्म्ससाठी बँकेकडून कर्जे मिळविली; त्यासाठी खोटे कागदपत्र दाखल केले. बँक अधिकाऱ्यांनी ह्या कागदपत्रांची योग्य छाननी न करता कर्जे दिली. सुमारे ६० लक्ष रुपयांची अशी कर्जे देण्यात आली. बँकेचा वरिष्ठ अधिकारी सुपरिंटेंडेंट ऑफ ब्रँचेस नलिनी रंजन दत्त आणि इतर सहाजण पोलिस कस्टडीत आहेत.

---

**हॉटेलात दरसाल ५०,००० रु. ची फूटतूट** – दिल्लीच्या अशोक हॉटेलाचे दरवर्षी कप-बश्या ग्लास इत्यादींच्या फूटतुटीमुळे ५०,००० रुपयांचे नुकसान होते.

**पाकिस्तानी कैद्यांवरील खर्च** — बांगला देशात ९१ हजारावर पाकिस्तानी सैनिक शरण आल्यावर त्यांना भारतात युद्धकैद्यांच्या छावण्यांत धाडण्यात आले. ह्या प्रत्येक कैद्यासाठी भारत सरकारला दरमहा १०० रुपये खर्च करावा लागत आहे. ह्या हिशोबाप्रमाणे युद्धकैद्यांवर आतापर्यंत झालेला खर्च ३ कोटी रुपयापेक्षा अधिक झालेला आहे.

### कर वसुलीचा खर्च वाढला

भारताच्या कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरलने लोकसभेला एक अहवाल सादर केला आहे. मध्यवर्ती सरकार कोट्यावधी रुपयांचे कराचे उत्पन्न कसे गमावते ते लोकसभेच्या नजरेला आणण्याच्या कामी हा अहवाल उपयुक्त आहे. करपात्र व्यक्ती अगर व्यापारी व धंदेवाईक संघटना ह्यांच्यावर आकारण्यात येणारे कर बसविण्यास पाहिजेत तितके बसविले जात नाहीत. शिवाय कायद्यातील इतरही काही दोषांमुळे सरकारचे कित्येक कोटी रुपयांचे उत्पन्न बुडते असे अहवालात प्रतिपादन करण्यात आले आहे. असे असले तरी १९७०-७१ ह्या साली सरकारी तिजोरीला अंदाजपत्रकात व्यक्त केलेल्या अपेक्षेपेक्षा ७२·४१ कोटी रुपये अधिक कराचे उत्पन्न झाले. तथापि बिगर कर विषयक बाबी-पासून होणाऱ्या उत्पन्नात ८·९६ कोटी रुपयांची घट आली. करांची वसूली करण्यासाठी येणाऱ्या खर्चात वाढ झालेली आहे. १९६७-६८ साली करवसुलीचा खर्च २९·६९ कोटी रुपये होता तो १९७०-७१ साली ४२·८९ कोटी रुपयापर्यंत वाढला. प्राप्तीवरील कर वसूल करण्याच्या खर्चात झालेली वाढ अहवालात नमूद करण्यात आली आहे. १९६७-६८ साली हा खर्च ९·३६ कोटी रुपये होता; तो १९७०-७१ साली ७·१७ कोटी रुपयांनी वाढून १६·५३ कोटी रुपये झाला. अबकारी कर वसूल करण्याच्या खर्चातही अशीच वाढ झालेली आहे. हा खर्च ६·६१ कोटी रुपयांवरून ८·६६ कोटी रुपयापर्यंत फुगला आहे. कंपन्यावरील करवसुलीचा खर्च मात्र फारसा वाढलेला नाही. १९६७-६८ साली कंपन्यावरील करवसुलीचा खर्च २·३४ कोटी रुपये होता तो १९७०-७१ साली २·३६ कोटी रुपये इतका म्हणजे फारच थोडा वाढला.

---

### ४,५०० वर्षांपूर्वी लागवड होत असलेले शेत

राजस्थानात कालिबंगन ह्या ठिकाणी ४,५०० वर्षांपूर्वी लागवड होत असलेले एक शेत पुरातत्त्व संशोधकांना सापडले आहे. हडाप्पा संस्कृतीच्याही पूर्वीचे हे शेत असावे असा त्यांचा अंदाज आहे. हा अंदाज खरा असेल तर जगातील सर्वांत प्राचीन लागवड झालेले हे पहिलेच शेत उघडकीस आले आहे असे म्हणावे लागेल. राजस्थानातील घग्गर नदीच्या डाव्या तीरावर असलेल्या ह्या शेतातील नांगरणीच्या खुणा काही विशिष्ट पद्धतीने पाडलेल्या आहेत. एकाच शेतात दोन जातीच्या धान्याची पिके घेण्यासाठी ही पद्धत वापरण्यात आलेली आहे. आजही ह्या भागात शेतकरी ही पद्धत वापरताना दिसून येतात. हडाप्पा संस्कृतीच्या पूर्वीच्या ह्या लोकांची संस्कृती चांगली प्रगत झालेली होती. ते विटांच्या घरात राहात आणि चांगली भाजलेली व कलापूर्ण आकृती काढलेली भांडी वापरत.

---

## चोरट्या आयातीबद्दल चिंता

भारतात कस्टम्स ड्यूटी चुकवून होणाऱ्या प्रचंड आयातीबद्दल पब्लिक अकौंट्स कमिटीने चिंता व्यक्त केली. सोन्याच्या आणि इतर प्रकारच्या ह्या आयातीसाठी १३० ते १७० रु. ची परदेशी हुंडणावळ लागली असती. चोरटी आयात पकडण्यासाठी पुरेशा वेगाच्या पुरेशा लॉंचेस कस्टम्स खात्याला द्या, असे कमिटीने अनेकवार सांगितलेले आहे, पण त्याचा उपयोग झालेला नाही. देशाची मोठी सरहद्द आणि हजारो मैलांचा किनारा ह्यावर परिणामकारक देखरेख ठेवता येणे कठीण आहे; सोने आणि घड्याळे लपवून आणता येणे सोपे असते; ती पकडणे अवघड असते; असा सरकारचा खुलासा आहे.

---

## सहकारी साखरकारखान्यातील कामगारांना वेतनवाढ

मालेगाव सहकारी साखरकारखाना लि. आणि सोमेश्वर सहकारी साखरकारखाना लि. ह्या दोन कारखान्यांनीं, रोजंदारीने काम करणारे ५,२०० कामगार हे कारखान्याचे कामगार समजावेत असा इंडस्ट्रिअल कोर्टाने निर्णय दिला आहे. सध्याच्या दरमहा ६० रु. ऐवजी ह्या कामगारांना ११५ रु. मिळतील. आणि १९६७ पासूनची बाकी त्यांना मिळेल. अशा रीतीने, त्यांना एकूण १·२८ कोटी रु. मिळतील. इतर २८ साखरकारखान्यांतील ट्रेड युनियन्स कोर्टात गेल्या, तर त्यातील ५५,००० कामगारांना असाच जास्त दराने पगार मिळेल.

---

## वाघाच्या व चित्त्याच्या कातड्यांच्या आयातीस बंदी

नैसर्गिक संपत्ती आणि प्राणिजीवन ह्याबद्दल सहानुभूती असणारे अनेक लोक जंगलांच्या व प्राण्यांच्या नाशाविषयी धोक्याचा इशारा देत आहेत. बऱ्याच देशांच्या सरकारांनी रक्षित वनविभागही स्थापन केले आहेत. परंतु त्यांच्या कायद्यांना न जुमानता जंगलातील प्राण्यांची हत्या चालू आहे. त्यामुळे काही प्राणी दुर्मिळ होत चालले आहेत. भारतामधील वाघांची व चित्त्यांची संख्या गेल्या काही वर्षांत खूपच घटली आहे. वन्य-पशूंच्या संरक्षणाला मदत व्हावी म्हणून ब्रिटनच्या सरकारने वाघांच्या व चित्त्यांच्या कातड्यांच्या आयातीवर बंदी घातली आहे. संबंधित देशातील कायद्यांना अनुसरून जर ही कातडी पैदा झालेली असतील तरच त्यांची आयात करण्यास परवानगी दिली जाईल.

---

**बल्गेरियाची धूम्रपान बंदी**— बल्गेरियामध्ये कचेऱ्यांत, रेस्टॉरंटमध्ये आणि इतर सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी करण्यात आली आहे. शाळांच्या जवळपासच्या ठिकाणी पिण्या-साठी मद्य विकण्यासही बंदी केली आहे.

**बजाज स्कूटर्सला निर्गतीची ऑर्डर**—बजाज ऑटो लि.-ला नायजेरियाच्या मिड-मोटर्स कंपनीकडून २५ लक्ष रु. च्या १,००० स्कूटर्सची ऑर्डर मिळाली आहे.


फोन नं. ५७७३२

पुरुषोत्तम नारायण गाडगीळ
आणि कंपनी

सराफ व जव्हेरी

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे-३०

♠ खात्रीचे सोन्याचे व मोत्याचे आकर्षक दागिने

♠ तन्मणी

♠ लफ्फे

♠ नेकलेस व सांगली घाटाची चांदीची सुबक भांडी तयार मिळतात



पुणेकरांच्या सहकार्याने प्रगतीपथावर असलेली
एक प्रमुख सहकारी बँक

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह
अर्बन बँक लि., पुणे

कांहीं बोलके आंकडे

| | | |
|---|---|---|
| (१) ठेवी | ... | रु. ८१ लाख. |
| (२) कर्जे | ... | रु. ६४ लाख. |
| (३) वसूल भागभांडवल... | | रु. ४ लाख ७५ हजार. |
| (४) खेळते भांडवल | ... | रु. १ कोटी. |

आकर्षक व्याज दराने (६॥ ते ८॥% मुदतीप्रमाणे) ठेवी स्वीकारण्यात येतात. सुरक्षित व किफायतशीर गुंतवणूकीसाठी आपण आपली रक्कम 'कॉसमॉस बँकेत' गुंतवा.

मुख्य कार्यालय :—
कॉसमॉस बँक बिल्डिंग
कुंटे चौक, लक्ष्मी रोड,
पुणे ३०. फोन-५६२८३.

शाखा :—
४९८-अ-२-पर्वतीदर्शन
पर्वती, पुणे क्र. ९
फोन-२७३८६.

### सहकारी क्षेत्रात हितसंबंधांचे दडपण

नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेने सहकारी क्षेत्रातील कामकाजासंबंधी नुकतीच एक पाहणी केली. ह्या पाहणीत गुजरातमधील भडोच जिल्हा, म्हैसूर राज्यातील बल्लारी जिल्हा आणि बिहार राज्यातील शहाबाद जिल्हा, ह्यांचा समावेश करण्यात आला होता. कमीअधिक फरकाने पाहणीत जमविलेल्या माहितीवरून काढण्यात आलेले निष्कर्ष इतर राज्यांतील सहकारी क्षेत्रांनाही लागू आहेत असे मानण्यास हरकत नाही. सहकारी चळवळीतील सर्व घटकांचे हितसंबंध परस्परांना पूरक असावयास पाहिजेत. तसे ते नसले तर सहकाराच्या यशाला बाध येण्याचा संभव असतो. पाहणीचा निष्कर्ष असा आहे की सहकारी चळवळीत खेड्याच्या पातळीवर सुद्धा निरनिराळे गट असतात आणि त्यांच्या दडपणाचा अनिष्ट परिणाम होत असतो. वास्तविक लायक शेतकऱ्यांना सहकारी पतपेढ्यांकडून आर्थिक साहाय्य व्हावयास हवे. परंतु अंतर्गत दडपणामुळे तसे होत नाही. अर्थातच ह्याचा परिणाम असा झाला आहे की काही राज्यांत तरी शेतीच्या उत्पादनात घट झाली आहे. शिवाय असेही आढळून आले की पतीवर मिळणाऱ्या कर्जाची मदत अपुरी आहे; त्याची वाटणीही उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने सातत्याने होत नाही. निरनिराळ्या गटांत वाटल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत प्रमाण-बद्धताही दिसून येत नाही. नियमातील पळवाटांचा फायदा घेतला जातो आणि कारभारात कल्पकता दाखविली जात नाही. ह्या सर्वांचा परिणाम होऊन सहकारात लोकांनी जितका रस घ्यावयास पाहिजे तितका तो घेतला जात नाही.

---

### सहकारी मार्केटिंग सोसायट्यांना भांडवली मदत

नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या संघटनेने सहकारी संघटनांना, विशेषतः मार्केटिंग सहकारी सोसायट्यांना मदत करण्यासाठी दोन योजना आखल्या आहेत. दोन्ही योजनांना भारत सरकारची मान्यताही मिळालेली आहे. सहकारी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा नीटसा होत नाही. कॉर्पोरेशनने आखलेल्या एका योजनेप्रमाणे मार्केटिंग सोसायट्यांचा भांडवलाचा पाया मजबूत करण्यात येणार आहे. त्यांना माल साठविण्याची गुदामे बांधण्यासाठी पैसा पुरविण्यात येणार आहे. म्हणजे ह्या सहकारी सोसायट्यांची माल साठविण्याची क्षमता वाढविण्यात येणार आहे. योजना पूर्ण झाल्यावर चौथ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या अखेरच्या दोन वर्षांत सहकारी क्षेत्रातील माल साठ-विण्याची क्षमता आणखी १० लाख टनांनी वाढेल. ह्या योजनेसाठी एकूण सुमारे १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यापैकी ९·४ कोटी रुपये कार्पोरेशन स्वतःच कर्जाच्या रूपाने देणार आहे. उरलेली रक्कम राज्य सरकारे आपल्या योजनेच्या खर्चातील भाग म्हणून देणार आहेत. अधिक पिके देणारे बी-बियाणे वापरून ज्या ज्या ठिकाणी उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्या ठिकाणच्या मार्केटिंग सोसायट्यांना योजनेचा लाभ होणार आहे. सुमारे ४०० सोसायट्यांना अशा रीतीने भांडवली मदत करण्यात येणार आहे. ही मदत देण्यासाठी कॉर्पोरेशन स्वतःचा २·५ कोटी रुपये देणार आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी संस्थांमार्फत शेतीच्या मालाची खरेदीविक्री करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. १९६८-६९ साली ५८८ कोटी रुपयांच्या मालाचा व्यवहार सहकारी संघटनांनी केला होता. १९७३-७४ सालापर्यंत त्यांच्या मार्फत ९०० कोटी रुपयांचे व्यवहार करण्याचे ठरविण्यात येत आहे.

---

### परदेशांना द्यावयाच्या मदतीत कपात करण्यासाठी नवे कारण

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन डॉलरची सत्ता सर्व जगभर पसरली. गेल्या पंचवीस वर्षांच्या काळात अमेरिकेने अप्रगत देशांना भरपूर मदत केली. पण अलीकडे ही मदत राजकीय हेतूंच्या पूर्ततेसाठी वळणावळणाने वापरली जाते असा अनुभव आशिआतील देशांना आला. त्यामुळे भारतासारख्या मोठ्या पण अविकसित देशांनी परदेशांच्या मदतीबद्दल सावधपणाची भूमिका स्वीकारली. व्हिएन्ना येथे भरलेल्या एशिअन डेव्हलपमेंट बँकेच्या बैठकीत बोलताना अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनीही ह्या-बद्दल इशारा दिला आहे. राजकीय कारणासाठी अमेरिकन मदत दिली जाते अगर नाकारली जाते असा आरोप येऊ नये म्हणूनच की काय अमेरिकेच्या फडणिसी खात्याचे दुय्यम चिटणीस मि. चार्लस वॉकर ह्यांनी बँकेच्या बैठकीत नवीच भूमिका घेतल्याचे दिसत आहे. त्यांचे म्हणणे असे की परदेशाकडून मदतीसाठी ज्या विनंत्या करण्यात येतात त्या अमेरिकेच्या खऱ्या महत्त्वाच्या गरजांशी स्पर्धा करीत नाहीत, ह्याविषयी अमेरिकेला ह्यापुढे काळजी घ्यावी लागेल. आंतरराष्ट्रीय मदतविषयक धोरण ठरविताना अमेरिकेच्या हिताकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही अशी भावना तेथे जोर धरू लागली आहे. गेल्या महायुद्धानंतर जी आंतरराष्ट्रीय परिस्थिती होती ती आता आमूलाग्र बदललेली आहे. आतापर्यंत अमेरिकेने जो मदतीचा व इतर भार परंपरागत धोरण म्हणून आपल्या शिरावर घेतला तो आता तसाच आपो-आप स्वीकारला जाईल असे नाही. शिवाय अमेरिकेच्या मजूर चळवळीत अमेरिकन मालाला संरक्षण देण्याच्या मागणीला पाठिंबा मिळू लागल्यास जगातील सर्वच देशांच्या हितसंबंधांना झळ लागण्याची शक्यता आहे.

---

**मधुमेहाचे १ कोटी रुग्ण** — इंडिअन डायाबेटिक असो-सिएशन ह्या संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. आजगांवकर ह्यांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे भारतामधील मधुमेहग्रस्त रुग्णांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. माणसाला घातक ठरणाऱ्या रोगांत मधुमेहाचा क्रमांक ७वा लागतो. ह्या रोगासंबंधी संशोधन करण्यासाठी मुंबईला एक संस्था काढण्याचे घाटत आहे.

# विविध माहिती

**तिरुपतीला विमानाने जाता येईल** — तिरुपती आता मद्रास, हैद्राबाद आणि बंगलोर ह्यांस विमानमार्गे जोडले जाईल. तिरुपतीचा विमानतळ लवकरच तयार होईल.

**हिंदी सायकलींची अमेरिकेकडे निर्गत** — सोनपत येथील एका सायकल कारखानदाराने अमेरिकेकडून १,२५,००० सायकलींची ऑर्डर मिळविली आहे. ह्या सायकलींना तीन गिअर्स बसविली जातील, ती आयात करावी लागतील. ह्या निर्गतीमुळे २ कोटी रु. ची परदेशी हुंडणावळ मिळेल. अमेरिकेत सायकलीवर बसण्याचे वेड पसरले आहे, त्याचा हा परिणाम आहे.

**इंडिअन एअरलाइन्सला ५·२० कोटी रु. तोटा** — १९७१–७२ मध्ये इंडियन एअरलाइन्सला ५·२० कोटी रु. तोटा झालेला असेल.

**चोरट्या आयातीमुळे सरकारचे नुकसान** — चोरटी आयात, हुंडणावळीचे गैरव्यवहार, इत्यादीमुळे भारताचे दरसाल २४० कोटी रु. चे नुकसान होते, असे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे.

**फोन डिरेक्टरी वर्षातून एकदाच** — ह्यापुढे फोन डिरेक्टरी वर्षातून फक्त एकदाच प्रसिद्ध होईल. सध्या ती दोनदा प्रसिद्ध होते. कागदाच्या तुटवड्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला. पोस्ट-तारखात्याला दरसाल १२,००० टन कागद लागतो. चालू वर्षी त्याला फक्त ७,७७३ टन कागद मिळणार आहे.

**सुप्रीम कोर्टाचे व हायकोर्टाचे जज्ज** — सुप्रीम कोर्टाचे १२ जज्ज असून हायकोर्ट जज्जांची संख्या २८० आहे.

**साखरेचे उत्पादन वाढणार** — पुढील वर्षी साखरेचे उत्पादन ४० लक्ष टन होईल अशी सरकारची अपेक्षा आहे. चालू वर्षी ते ३१ लक्ष टन झाले.

**ओव्हरटाइमचे प्रमाण वाढत चालले** — इंडियन एअरलाइन्सने १९६९-७० मध्ये पगारापोटी १२·०३ कोटी रु. आणि ओव्हरटाइमच्या पोटी २·३८ कोटी रु. दिले. १९६८-६९ मध्ये तत्सम आकडे १०·७२ कोटी रु. आणि १·८१ कोटी रु. असे होते, तर १९६७-६८ मध्ये ते ९·९८ कोटी रु. आणि १.६२ कोटी रु. असे होते.

**अल्पबचत योजनेचे लक्ष्य** — चालू वर्षाचे अल्पबचत गुंतवणुकीचे लक्ष्य २५० कोटी रु. ठरविण्यात आले आहे. १९७१-७२ मध्ये अल्पबचत योजनेत २२०·५० कोटी रु. ची गुंतवणूक झाली.

**बांगला देशाचे निर्वासित** — १ एप्रिल पर्यंत ९८,९९,३०५ निर्वासितांपैकी ९८,६९,३५४ निर्वासित परत गेले आहेत. बाकीचे आपल्या मित्रांकडे व नातलगांकडे राहात आहेत; तेही लवकरच परत जातील.

**भारत सरकार समर्थ झाले** — भारतातील अमेरिकन आणि फ्रेंच वकिलाती भारतात प्रवास करण्यासाठी स्वतःची विमाने वापरीत असत. अशी विमाने बाळगण्यास आणि त्यातून प्रवास करण्यास भारत सरकार बंदी घालीत आहे. ह्या विमानातून हेरगिरी होण्याचा संभव असतो. फ्रान्सने बंदी मान्य केली आहे; अमेरिकन सरकार अजून वाटाघाटी करीत आहे.

**ट्रेड फेअरवर मुस्लिम देशांचा बहिष्कार** — दिल्ली येथे येत्या नोव्हेंबरमध्ये भरणाऱ्या एशियन ट्रेड फेअरवर बहुतेक सर्व मुस्लिम देश बहिष्कार घालणार आहेत. आधी जे मुस्लिम देश त्यात भाग घेणार होते, त्यांनी भारत–पाकिस्तान युद्धानंतर स्वतःचे मत बदलले आहे. इजिप्तने काटकसरीची सबब सांगितली आहे.

**इंदिरा गांधींचे उदाहरण** — श्रीमती इंदिरा गांधी ह्यांना त्यांच्या ४० मंत्र्यांनी नुकतीच मेजवानी दिली. बांगला देशाचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्यांनी कोणत्याच मेजवानीचे आमंत्रण पत्करलेले नव्हते. परदेशी पाहुण्यांच्या सन्मानार्थ दिलेल्या मेजवान्यांखेरीज कुठेच त्या भोजनास गेल्या नाहीत. त्यांच्या खास सूचनेवरून निरर्थक गप्पागोष्टींना सक्त बंदी होती. भोजनोत्तर संगीताचा कार्यक्रम झाला.

**राज्यांचे ओव्हरड्राफ्ट** — राज्यांनी रिझर्व्ह बँकेकडून घेतलेले ओव्हरड्राफ्ट कमी होण्याच्या ऐवजी वाढतच आहेत. दोन वर्षात त्यांची रक्कम ११९ कोटी रु. वरून २५४ कोटी रु. वर गेली आहे. आंध्र प्रदेश (८७ कोटी रु.), राजस्तान (८६ कोटी रु.), म्हैसूर (७९ कोटी रु.) आणि तामीळनाडू (७५ कोटी रु.) ह्यांचे ओव्हरड्राफ्ट सर्वांत जास्त आहेत. महाराष्ट्राचा ओव्हरड्राफ्ट १४ कोटी रु.चा आहे.

**पाइप लाइन अफरातफर चौकशी : उच्च अधिकाऱ्यांना नोटिसा** — भारत सरकारच्या पेट्रोलियम खात्यातील आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशनमधील कित्येक अधिकाऱ्यांवरील लाच-लुचपतीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सरकारने एक कमिशन नेमले आहे. हल्दिया-बरौणी-कानपूर आणि गोहटी-सिलिगुरी पाइप लाइन्सच्या कामातील लाचलुचपतीबद्दल बराच गवगवा झाला होता. पार्लमेंटच्या कमिटीने ह्या संबंधी बरेच ताशेरे झाडले होते. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे वियमान संचालक श्री. अरुण रॉय चौधरी ह्यांनी शपथेवर केलेल्या विधानांचे आधारे आधी दोन महिने गुप्त चौकशी केल्यानंतर चौकशी कमिशनने ज्यांच्या वागणुकीची चौकशी करण्याचे ठरवून ज्यांना नोटिसा काढल्या आहेत, त्यात ओरिसाचे गव्हर्नर श्री. जोगेंद्र सिंह, बिहारचे गव्हर्नर श्री. बरुच, परदेशीय व्यापार मंत्री श्री एल. एल. मित्रा, त्याचप्रमाणे ६ आय. सी. एस. अधिकारी, ८ आय. ए. एस. अधिकारी आणि ८ इतर दर्जाचे अधिकारी आहेत.

**सिगारेट लेबल** — सिगारेटच्या कारखानदारांना सिगारेटच्या लेबलावर "धूम्रपानामुळे कॅन्सरसारखे भयानक रोग होतात." असे छापण्यास सांगण्याचा सरकार विचार करीत आहे.

BANK TO BANK...

# THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth,**
**BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT**
*General Manager.*

**K. B. KIRTIKAR**
*Chairman.*




**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
MADHAVNAGAR (S. Rly)
Phone : 318 Gram : 'SEWA
Sangli Madhavnagar




आर्थिक मदतीसाठी शेतकरी कोणाकडून घेणाऱ्या खालील योजनांचा आम्ही सहानुभूतिपूर्वक विचार करतो :-

■ खते, बी-बियाणे, जंतुनाशक द्रव्ये इत्यादींसाठी अल्पमुदतीचे कर्ज ■ पंपसेट, ट्रॅक्टर यांसारखी शेतकी आयुधे खरेदी करण्यासाठी, तसेच जमिनीत पाणीपुरवठा, विहिरींवर वीजव्यवस्था, शेतावर पक्क्या व्यवस्था इत्यादींसाठी मध्यम मुदतीचे कर्ज ■ शेती, मळे यांचा विकास, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इत्यादींसाठी दीर्घ मुदतीचे कर्ज.

शेतीला उपयुक्त खते व आयुधे यांचे उत्पादक आणि वितरक यांनाही, त्यांच्या विक्री व वितरण योजनांसाठी आम्ही आर्थिक साह्य करतो.

आमच्या कोणत्याही शाखेशी किंवा मुंबईच्या मुख्य कचेरीतील ॲग्रिकल्चरल फायनान्स डिपार्टमेंटशी संपर्क साधा.

**बँक ऑफ इंडिया**

प्रत्येक दिवशी, प्रत्येक प्रकारे
आपल्या सेवेस सिद्ध

महाबँक

आम्ही त्याला म्हणतो परिपूर्ण बँकिंग सेवा—

- तुमच्यासाठी बचतीच्या हरतऱ्हेच्या योजना,
- तुमच्या मौल्यवान् जिनसांची सुरक्षितता,
- उद्योग आणि व्यापार यांना आर्थिक साहाय्य,
- आणि मागास विभागांचा आर्थिक विकास.

आमच्या सेवेची ही विविधता पाहा :

* सेव्हिंग्ज बँक खाते
* चालू खाते
* मुदत ठेव खाते
* रिकरिंग डिपॉझिट खाते
* कुपन डिपॉझिट योजना
* ॲन्युइटी डिपॉझिट योजना
* क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट योजना
* लोकमंगल डिपॉझिट योजना
* सेफ डिपॉझिट लॉकर्स
* लघुउद्योग, शेती, छोटे उपक्रम, व्यवसाय, इत्यादींना मदत
* परदेश हुंडणावळ व्यवहार

**ह्यांनी परिपूर्ण म्हणजे महाबँक–**

—आपल्या सेवेस तत्पर आहे—

# बँक ऑफ महाराष्ट्र

गु

निर्धार

आपल्या पुणे, पेठ शिवाजीनगर घ. क्र. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )
परत जातील